GLOBAL DAY OF RAGE
NO 377 GOING BACK!
SANGRAM, VAMP, MUSKAN VAMP+, VIDROHI MAHILA MANCH, MITRA

**समलैंगिकांना गुन्हेगारीच्या चौकटीतून मुक्त करा.**

जागतिक संताप दिवस
NO 377 माघारी जाणार नाही!
संग्राम, वॅम्प, मुस्कान वॅम्प +, विद्रोही महिला मंच, मित्रा

अहमदाबाद, ॲन आर्बर, बर्लिन, बोस्टन, बेंगलोर, केंब्रिज, चेन्नई, दिल्ली, गोरखपूर, जोहान्सबर्ग, कलकत्ता, लंडन, लखनौ, मेंगलोर, मुंबई, म्हैसुर, न्युयॉर्क, पुणे, रिचमन्ड, सांगली, सिडनी, टोरोन्टो, वॉशिंग्टन–डीसी, वॅनकूवर

# जागतिक संताप दिवस... माघारी जाणार नाही

आज दि. १५/१२/१३ जागतिक संताप दिवसाला आम्ही कायद्यातील ३७७ कलम पुन्हा रद्द बादल ठरवण्यात येण्याकरीता, समलैंगिकांकरीता, मानवी हक्कांची आमची लढाई अशीच चालू ठेवू. **माघारी जाणार नाही...**

एलजीबीटी (स्त्री,पुरुष,तृतीयपंथी (हिजडा–जोगाप्पा)) यांच्या समलिंगी संबंध करण्याला गुन्हा न मानण्याचा दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला निकाल सर्वोच्च न्यायालयाने नाकारला. भारतभरच्या समलिंगी व्यक्तींच्या न्याय्य मानवी अधिकारांसाठी आजवर झालेल्या प्रयत्नांवर सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाने बोळा फिरवला आहे.

सुरेश कुमार कौशल वि. नाझ फौंडेशन या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निकालाने आम्हाला फार मोठा धक्का बसला आहे. या निर्णयाच्या विरोधात देशभरातल्या लाखोंनी आवाज उठवला आहे, त्यात आम्ही सामील होत आहोत. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालाने समलिंगी असणाऱ्यांना गुन्हेगार ठरवले जाऊ नये असे म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाने त्याविरुद्ध दिलेल्या निकालाने भारताला शंभर वर्षे मागे खेचलेले आहे.

नाझ फौंडेशनच्या या खटल्याचा निकाल अशा प्रकारे उलटवून सर्वोच्च न्यायालयाने देशातील प्रत्येक नागरिकाला घटनेने बहाल केलेल्या मुलभूत हक्कांपासून वंचित केले आहे आणि एलजीबीटी व्यक्तींना तर भेदभाव, हिंसाचार आणि छळाला अगतिकपणे सामोरे जाण्यावाचून पर्याय ठेवलेला नाही. अशा प्रकाराने एलजीबीटी व्यक्तींना गुन्हेगार ठरवून सर्वोच्च न्यायालयाने भारतीय घटनेच्या मूलाधारी असलेल्या सर्वांना सामावून घेणारे असे जवाहरलाल नेहरूंनी ज्याचे वर्णन केले होते तेच तत्व पायदळी तुडवले आहे.

भारतासारख्या विविधतेनं नटलेल्या, अनेकरंगी देशामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेतील मांडलेला मूलभूत नैतिकतेचा सिद्धांत (बहुसंख्यांनी अल्पसंख्यांना केवळ ते अल्पसंख्य आहेत म्हणून वेगळे काढू नये) आवश्यकच असताना त्याचा जणू चोळामोळा करून फेकून दिला आहे. या देशातील सर्व नागरिकांना समान आदरभावाने वागवले जाईल, समान अधिकार असतील, न्यायव्यवस्थेचे सुरक्षा कवच सर्वांना समान मानेल असे भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे वचन या निकालाने भंगले आहे. न्यायासनानेच शिरोधार्य मानलेल्या तत्वांच्या चिंध्या आपणच केल्यामुळे जनमनातल्या राज्यघटनेवरच्या विश्वासाला तडा गेलेला आहे. हा निर्णय तर वाईट आहेच, पण त्याहून भयंकर आहेत, ते त्याचे भविष्यात होत राहणारे परिणाम.

एलजीबीटी (स्त्री, पुरुष, तृतीयपंथी (हिजडा–जोगाप्पा)) व्यक्ती या निकालाचा गैरपरिणाम स्वतःच्या आयुष्यावर होऊ देणार नाहीत अशी आम्हाला आशा आहे. येणाऱ्या दहा वर्षात एलजीबीटी व्यक्तींना आपल्या मूलभूत अधिकारांसाठी, समान नागरी हक्कांसाठी लढा द्यावा लागणार आहे, संघर्ष जारी ठेवावा लागणार आहे. एलजीबीटी व्यक्तींचा स्वातंत्र्याचा समानतेचा आणि सन्मानाचा हक्क डावलता येणार नाही, तो त्यांना आहेच. नाझ फौंडेशनने म्हटल्याप्रमाणे हे हक्क त्यांना कोर्टाने दिलेले नाहीत, त्यांनी ते मिळतील अशी केवळ शाश्वती दिलेली आहे.

**संग्राम, वॅम्प, मुस्कान**
आरोहन, घनश्यामनगर,माधवनगर रोड, सांगली.
फोन : २३१२१९१



**वॅम्प+ , विद्रोही महिला मंच, मित्रा**
बालजगत, बालाजीनगर, सांगली.
फोन : २३१२८६६, २३२५१९१